**<u>ठळक बातम्या</u>**

- एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- युनेस्कोमधले भारताचे प्रतिनिधी विशाल शर्मा, आणि अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संघ ठरले छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्काराचे पहिले मानकरी

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची राज्य सरकारची नोटीस

**आणि**

- जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं निधन

**<><><><>**

राज्य सरकारनं एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला मंजुरी दिली आहे. राज्य मंत्रीमंडळाच्या आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरणालाही सरकारनं मान्यता दिली आहे. कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांचं अनुदान प्रति रुग्ण २ हजारांवरून ६ हजार रुपये करायलाही मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**<><><><>**

राज्य सरकारनं यंदाचा छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार युनेस्कोमधले भारताचे प्रतिनिधी विशाल शर्मा आणि अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संघाला जाहीर केला आहे. ३ लाख रुपये, मानचिन्ह, प्रमाणपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. हे या पुरस्कारांचं पहिलंच वर्ष आहे. ऐतिहासिक वारसा स्थळांचं जतन संवर्धन करणाऱ्या आणि जागतिक स्तरावर त्यांची ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांना जागतिक वारसा मिळवून देण्याच्या कामात विशाल शर्मा यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलं होतं.

**<><><><>**

रालोआ म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्लीत झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह रालोआचे इतर खासदार यावेळी उपस्थित होते.

ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यशस्वीपणे राबवल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांचं या बैठकीत अभिनंदन करण्यात आलं. सशस्त्र दलांच्या वचनबद्धतेचं कौतुक करणारा ठरावही सर्व खासदारांनी मंजूर केला. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी ही विरोधकांची चूक होती असं भाष्य प्रधानमंत्र्यांनी भाषणात केलं. ‘हर घर तिरंगा’, राष्ट्रीय क्रीडा दिन-२९ ऑगस्ट, आणि राष्ट्रीय अंतराळ दिन -२३ ऑगस्ट हे दिवस साजरे करावे असं त्यांनी खासदारांना सांगितलं.

**<><><><>**

दरवर्षीप्रमाणेच यंदाही येत्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा मोहीम राबवण्यात येणार आहे. सर्वांनी तिरंगा ध्वज फडकवावा, त्यासोबतचा आपला सेल्फी हरघरतिरंगाडॉटकॉम या संकेतस्थळावर अपलोड करावा, असं आवाहन सरकारनं केलं आहे. या मोहिमेसाठी कार्यकर्ता म्हणून नोंदणी गेल्या शनिवारपासून सुरु झाली असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या नांदणी मठातली महादेवी हत्तीण परत आणावी, ही जनभावना लक्षात घेत, राज्य शासन या संदर्भात स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात भूमिका मांडेल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. महादेवी हत्तिणीच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्य शासन याप्रकरणात पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचं त्यांनी सांगितलं. नांदणी मठानं सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, असंही मुख्यमंत्री म्हणाले. हत्तीणीची निगा राखण्यासाठी राज्य सरकार डॉक्टरचा समावेश असलेलं

एक पथक तयार करेल. या प्रकरणात नागरिकांच्या विरोधात दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असं  त्यांनी सांगितलं.

<><><><>

कबूतरखाना अचानक बंद करणे योग्य नाही, त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था पूर्ण होईपर्यंत मुंबई महापालिकेनं कबुतरांना नियंत्रित खाद्यपुरवठा सुरू ठेवावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. कबुतरांसाठी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत त्यांची उपासमार होऊ नये याकडे लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मुंबई महापालिकेला पक्षीगृह उभारण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची नोटीस राज्य सरकारनं पाठवली आहे. महिनाभरात पैसे परत नाही दिले नाही तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा सरकारनं त्यांना नोटीशीद्वारे दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून सुमारे साडे २१ कोटी रुपये या पुरुषांच्या खात्यात जमा झाले आहेत.

<><><><>

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात UPI वरून केल्या जाणाऱ्या दैनंदिन व्यवहारांनी पहिल्यांदाच ७० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया -NPCI नं प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, २ ऑगस्ट रोजी UPI व्यवहारांची संख्या सुमारे ७० कोटी ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

गेल्या दोन वर्षांत UPI व्यवहारांची दैनंदिन संख्या दुपटीनं वाढली असली, तरी एकूण व्यवहारांच्या रकमेच्या वाढीचा वेग गेल्यावर्षीच्या तुलनेत मंदावला आहे. केंद्र सरकारनं UPI च्या माध्यमातून दररोज १०० कोटी व्यवहारांचं लक्ष्य ठेवलं असून ते पुढील वर्षी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

गेल्या महिन्यात UPI प्रणालीनं सुमारे एक हजार ९५० कोटी व्यवहार नोंदवले असून त्यांची एकूण किंमत २५ लाख कोटी रुपयांहून अधिक होती. सध्या भारतात ८५ टक्के व्यवहार हे UPI च्या माध्यमातून होतात. तर जगभरातील एकूण रिअल टाईम डिजीटल व्यवहारांपैकी सुमारे ५० टक्के व्यवहार हे UPI द्वारे केले जातात.

<><><><>

गेल्या काही दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात जनावरांमध्ये लंपी आजाराचा प्रादुर्भाव दिसत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून जनावरांच्या लसीकरणाची मोहिम राबवली जात आहे. लंपी आजार संसर्गजन्य असल्यानं त्याच्या प्रतिबंधासाठी सर्व पशुपालकांनी जनावरांचं लसीकरण करुन घ्यावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं आज प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते एकोणऐंशी वर्षांचे होते. नवी दिल्लीच्या राममनोहर लोहिया रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते.

संविधानाचं ३७०वं कलम रद्द करुन जम्मूकाश्मीरचा विशेष दर्जा काढून घेण्याची कारवाई सत्यपाल मलिक यांच्या कार्यकाळात झाली होती.

मलिक यांच्या राजकीय कारकिर्दीला १९७४ मधे उत्तरप्रदेश विधानसभेतून प्रारंभ झाला. त्यानंतर त्यांनी अनेकदा राज्यसभेत उत्तरप्रदेशचं प्रतिनिधित्व केलं. लोकसभेत ते अलिगढ मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर निवडून गेले होते. बिहार, ओदिशा, गोवा आणि मेघालयचं राज्यपालपदही त्यांनी भूषवलं होतं.

<><><><>

झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांच्या पार्थिवावर आज रांची इथे अंत्यसंस्कार होणार आहेत. तत्पूर्वी त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली होती. अनेक मान्यवरांनी आणि सोरेन जनसामान्यांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.

<><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत इंग्लंडबरोबर साधलेल्या गुणांच्या बरोबरीमुळे भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ओव्हल इथे झालेल्या या कसोटी सामन्यापूर्वी इंग्लंड गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर होता. काल झालेल्या या मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर विजय मिळवत २-२ अशी बरोबरी साधली. ५ गडी बाद करणारा मोहम्मद सिराज हा सामनावीर ठरला. शुभमन गिल आणि हॅरी ब्रुक हे दोघं मालिकावीर

ठरले. या विजयामुळे भारताच्या खात्यात १२ गुणांची भर पडली असून भारतीय संघ आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ या गुणतालिकेत आघाडीवर आहे.

**<><><><>**

प्रसिद्ध टेनिसपटू नोवाक जोकोविच याने सिनसिनाटी टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या विम्बल्डन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत वैद्यकीय कारणांमुळे माघार घेतल्यानंतर जोकोविच प्रथमच हार्ड कोर्ट प्रकाराच्या या स्पर्धेत सहभागी होणार होता. मात्र आता तो थेट येत्या २४ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत खेळणार आहे.

**<><><><>**

दिल्लीत वेगवेगळ्या ठिकाणी असलेली मंत्रालयांची कार्यालयं एका ठिकाणी आणून कार्यक्षमता, नवोन्मेष वाढवण्यासाठी कर्तव्य भवनाची रचना करण्यात आल्याचं केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विभाग मंत्री मनोहर लाल यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. उद्या दुपारी तीन वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कर्तव्य भवनाचं उद्घाटन करणार आहेत.

**//<><><><>//**